म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक पांडुरंग मोरेश्वर पोतदार | सन १८६५ |
|---|---|---|
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव महाराष्ट्र देशाच्या इतिहासाचे संक्षिप्त वर्णन. | |

१८६५

इति.

म. ग्रं. मं. ठाणें
...य ... १२९
नं. २०

... आणा.

...गी पुस्तकमाला.

नंबर १०

# महाराष्ट्र देशाच्या इतिहासाचें संक्षिप्त वर्णन.

( मराठी चवथ्या इयत्तेकरितां. )

पांडुरंग मोरेश्वर पोतदार,
यांनीं तयार केलें.

सुधारलेली आवृत्ति दहावी.

पोतदार कृत
पुस्तकमाला.

[हीं पुस्तकें वासुदेव मोरेश्वर पोतदार, कांदेवाडी, मुंबई, यांजकडे किंवा मुंबईत रामवाडीचे नाक्यावर पोतदारांचे पुस्तकांचे दुकानीं विकत मिळतील.]

मुंबई--"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिलें.
मे सन १८९६.

[ या पुस्तकाबद्दल सर्व हक्क मालकानें राखिले आहेत. ]

# सूचना.

मराठी चौथी इयत्ता शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस महाराष्ट्र देशाच्या इतिहासाची माहिती लागते, व ती संपादन करून घेण्याचा मार्ग ह्मटला तर हल्लीं विद्याखात्यांत जें पुस्तक चालू आहे त्याशिवाय दुसरा नाहीं. सदरहू पुस्तक बरेंच विस्तारानें लिहिलेलें असल्यामुळें त्यांतील सर्व माहिती ध्यानांत ठेवण्यास विद्यार्थ्यांस कठीण पडतें. ही अडचण कांहीं अंशीं दूर व्हावी आणि त्यांस अल्प किंमतींत थोडक्यांत लिहिलेलें सर्व माहितीचें व ध्यानांत ठेवण्यास योग्य असें लहानसें पुस्तक मिळावें ह्मणून हें पुस्तक तयार केलें आहे.

या लहानशा पुस्तकांत महाराष्ट्र देशाच्या इतिहासांतील मराठी राजे, पेशवे वगैरे ह्यांच्या कारकीर्दींत घडलेल्या सर्व मुख्य मुख्य व ध्यानांत ठेवण्यांसारख्या गोष्टी अनुक्रमानें विस्तार कमी करून लिहिल्या आहेत. त्या सर्व गोष्टी शिक्षकांनीं मुलांकडून अक्षरशः पाठ न करवितां त्यांकडून वाचवून गोष्टीच्या रूपानें त्यांच्या मनांत ठसतील अशा रीतीनें समजून सांगत जाव्या ह्मणजे सर्व गोष्टी अनुक्रमानें त्यांच्या लक्षांत राहतील.

या पुस्तकाचा विद्यार्थ्यांनीं चांगला उपयोग केल्यास त्यांस बरीच माहिती होईल अशी माझी खात्री आहे.

# महाराष्ट्र देशाच्या इतिहासाचें संक्षिप्त वर्णन.

## भाग १.

**शालिवाहनः**—**महाराष्ट्र** देशांत इसवी सनाचे पहिल्या शतकांत हा एक प्रख्यात व शककर्ता राजा होऊन गेला. त्याची राजधानी **प्रतिष्ठान** ( पैठण ) नामें शहर होतें. त्याचा शक इसवी सनानंतर ७८। वर्षांनीं सुरू झाला.

**अल्लाउद्दीन खिलजीः**—यानें इ० सनाच्या १४ व्या शतकांत प्रथम **नर्मदेच्या** दक्षिणेस स्वारी करून **देवगड** ( दौलताबाद ) येथील **रामदेवराव जाधव** नांवाच्या राजाचा पराभव करून पुष्कळ द्रव्य नेलें.

**ब्राह्मणी राज्यः**—**दिल्लीचा** बादशाह **महमद तघलख** याच्या कारकीर्दींत **जाफरखान** नामें सरदारानें इसवी सन १३४७ त या राज्याची स्थापना केली. त्याची राजधानी प्रथम **कलबुर्गें** शहर होतें, नंतर **बेदर** शहर झालें. हें राज्य सुमारें १५० वर्षें चाललें, व त्याचीं इ० सन १५२६ त पांच राज्यें झालीं. तीं:—१ **विजापुरचें** ( आदिलशाही ), २ **गोवळकोंडचें** ( कुतुबशाही ), हीं राज्यें **औरंगजेबानें** १६८७ त बुडविलीं; ३ **अहमदनगरचें** ( निजामशाही ), हें १६३७ त **शाहाजहानानें** बुडविलें; ४ **वऱ्हाडचें** (अहमदशाही ), हें **अहमदनगरच्या** बादशाहानें इसवी सन १५७४ त बुडविलें; ५ **बेदरचें** ( बरीदशाही ), हें **अकबरानें** इ० स० १६०९ त बुडविलें.

**दुर्गादेवी दुष्काळ**:-**ब्राह्मणी** राजे राज्य करीत असतां इ० स० १३९६ त **महाराष्ट्र** देशांत मोठा दुष्काळ पडला होता. तो १२ वर्षे होता. त्यास **दुर्गादेवी** असें ह्मणतात. त्या बारा वर्षांत **महाराष्ट्र** देशांत पाऊस मुळींच पडला नाहीं असें ह्मणतात.

**शिरके**:-**ब्राह्मणी** राज्याचे वेळीं **कोंकणां**त **शिरके** या नांवाचा एक मोठा पराक्रमी सरदार होता. त्यानें **मुसलमान** लोकांशीं लढून आपला बचाव केला. हल्लीं त्याचे वंशज **कोंकणां**त आहेत.

**वास्को दि गामा**:-हा **पोर्तुगीज** लोकांचा सरदार इ० स० १४९७ त प्रथम **कालिकोट** बंदरांत आला; आणि त्यानें इ० स० १५१० त **गोवें** शहर हस्तगत करून घेतलें.

**चांदबिबी**:-ही पराक्रमी स्त्री **अहमदनगर**चा बादशाह **बाहद्दर निजामशाह** याची नातगल होती. **अकबरा**पासून त्या शहराचें रक्षण करण्यासाठीं झटत असतां ती मारेकऱ्याकडून मारली गेली.

**मलिकंबर**:-हा **अहमदनगर**च्या राज्यांत एक अत्यंत बुद्धिमान् प्रधान होता. त्यानें **दौलताबादेस निजामशाही** राज्याची स्थापना करून **खिडकी** (औरंगाबाद) या नांवाचें नवीन शहर वसविलें व ती **निजामशाही**ची राजधानी केली. त्यानें वसूल घेण्याचे वगैरे फार उत्तम नियम केले होते.

---

## भाग २.

## मराठे राजांचें वर्णन.

**शिवाजीचे पूर्वज**:-ह्याच्या पूर्वजांचें उपनांव **भोंसले**

असून ते **वेरूळ** गांवीं राहत असत. **शिवाजी**चा आजा **मालोजी** हा **शिंदकेरच्या जाधवरावा**च्या आश्रयानें **निजामशाही** सरकारचे चाकरीस राहिला. पुढें त्याला त्या सरकारांतून **शिवनेरी** व **चाकण** ह्या किल्ल्यांची व त्याचे खालीं असणाऱ्या प्रांतांची मामलत, व **पुणें** व **सुपें** ह्या परगण्यांची जाहागीर मिळाली.

**शाहाजी**:–हा **मालोजी**चा मुलगा. हा कांहीं दिवस **निजामशाही** सरकारचे आश्रयास होता, परंतु तें राज्य बुडाल्यावर **शाहाजहाना**चे पदरीं राहिला. त्या बादशाहानें दिलेलीं कांहीं इनामें परत घेतल्यामुळें त्यानें तें सरकार सोडून **विजापूर** सरकारचा आश्रय धरिला. हा इ० स० १६६४ त मरण पावला. त्यावेळीं त्याच्या ताब्यांत **पुणें, सुपें** आणि **तंजावर** हे प्रांत होते.

**शिवाजी**:–( इसवी सन १६७४–१६८०.) हा इ० स० १६२७ त **शिवनेरी** किल्ल्यांत जन्मला.

**त्याचें लहानपणचें शिक्षण**:–**शाहाजी कर्नाटकां**त आपले जाहागिरीवर जावयास निघाला, तेव्हां **शिवाजी** व **जिजाबाई** ह्यांस **दादोजी कोंडदेव** या नांवाचा त्याचा एक मोठा चतुर आणि विश्वासू कारभारी होता, त्याचे स्वाधीन केलें होतें. त्याच्या सुसंगतीनें व शिक्षणानें राज्यकारभार चालवितां येण्यासारखे पुष्कळ गुण **शिवाजी**च्या आंगीं आले. परंतु त्याला लिहिणें, वाचणें अगदीं आवडत नसे. तथापि तो धनुर्विद्या, घोड्यावर बसणें इत्यादि कामांत प्रवीण होता. त्याला पुराणांतील युद्धांच्या कथा ऐकण्याची फार आवड असे. त्याची हिंदुधर्मावर अत्यंत श्रद्धा असून तो **मुसलमानधर्मा**चा तिरस्कार करी.

**त्याच्या पराक्रमाचा आरंभः—शिवाजी** सोळा वर्षांचा झाला नाहीं तोंच त्यानें आडदांड लोकांच्या संगतीनें देशांत बंडाळी माजविली; व घाटमाथ्यावरील शूर व अत्यंत विश्वासू मावळे लोकांस वश करून घेतलें. त्यांत **एसाजी कंक, तानाजी मालुसरा** आणि **बाजी फसलकर** हे **शिवाजी**चे परमस्नेही होते. त्यानें इ० स० १६४६ त **तोरणा किल्ला** घेतला व त्याचे आग्नेयी दिशेस दीड कोसा-वर **राजगड** नांवाचा किल्ला बांधिला. इ० स० १६४७ त **दादोजी कोंडदेव** मरण पावला; त्यानंतर थोडक्याच दिवसांत **शिवाजीनें चाकण, पुरंदर** आणि **कोंडाणें** हे किल्ले घेतले; व **कोंडाणें** किल्ल्याचें '**सिंहगड** असें नांव ठेविलें. त्यानें **सुपें** परगणाही तेथील मामलेदारावर छापा घालून घेतला. पुढें इ० स० १६४८ त त्यानें **कल्याणचा** सुभा व **कोंकण**पट्टींतील बरेच किल्ले घेतले.

**शाहाजी कैदेंत पडतो :—शाहाजी**च्याच संमतीनें **शिवाजीनें** बंडावा माजविला असेल, असें **विजापुर**च्या बादशाहास वाटून त्यानें **शाहाजी**ला कैदेंत ठेविलें; परंतु **शिवाजीनें दिल्ली**चा बादशाह **शहाजहान** ह्याची चाकरी करण्याचें कबूल करून त्याजकडून **विजापुरकरांस** दहशत घालून त्याची सुटका करविली.

**शामराजपंत :**—इ० स० १६५६ त त्यानें **शामराजपंत** नामें ब्राह्मणास **पेशवा** असें पद देऊन त्याला **जंजिऱ्याच्या** शिद्दीवर पाठविलें; परंतु त्याचा पराभव झाला. त्यामुळें **शिवाजीनें** त्याकडून तो अधिकार काढून **मोरोपंत पिंगळे** ह्यास दिला; व त्याला शिद्दीवर पाठविलें.

**अफझुलखान :—शिवाजीचें** पारिपत्य करण्याकरितां

**विजापुरच्या** बादशाहानें **अफ्जुलखान** नामें सरदार पाठविला. परंतु **शिवाजीनें** त्याच्याशीं एकांतीं मसलत करण्याचा घाट घालून त्याला **प्रतापगडा**जवळ ठार मारिलें.

**रुस्तुमजमान व शिद्दीजोहारः**—हें वर्तमान समजतांच बादशाहानें इ० स० १६६० त **रुस्तुमजमान** नामें सरदार पाठविला. त्याचा त्यानें पराभव करून **विजापुरा**पर्यंत खंडणी घेतली, आणि **कोंकणां**त जाऊन **दाभोळ** शहर लुटलें. त्यानंतर बादशाहानें **शिद्दीजोहार** नामें सरदार पाठविला. त्यानें **शिवाजी पन्हाळ्यावर** असतां त्या किल्ल्यास वेढा घातला; परंतु **शिवाजीनें** त्याच्याशीं तह करण्याचा घाट घालून ते लोक गैरसावध असतां पळून गेला. नंतर **शिवाजीचें** पारिपत्य आपल्या हातून होणें कठीण असें समजून **विजापुरकरांनीं** इ० स० १६६२ त त्याच्याशीं तह केला.

**शिवाजीच्या मोंगलांच्या मुलखावर स्वाऱ्याः**—**शिवाजी**ला **विजापुरकरां**पासून भीति नाहींशी झाल्यामुळें त्यानें इ० स० १६६२ त **मोंगलां**च्या मुलखांत स्वारी करून **औरंगाबादे**पर्यंत मुलूख लुटला. तेव्हां **औरंगजेबानें शिवाजी**वर **शाइस्तेखान** नामें सरदार पाठविला. त्याचा **शिवाजीनें** मोड करून त्याला हांकून लाविलें. नंतर इ० स० १६६९ त त्यानें **मोंगलां**च्या ताब्यांतील **सुरत** शहर लुटून पुष्कळ द्रव्य नेलें.

**शिवाजीनें राजा हा किताब घेतलाः**—इसवी सन १६६४ त **शाहाजी** मृत्यु पावला, त्याच वर्षी **शिवाजीनें** आपल्या नांवास राजा हा किताब जोडला, व आपल्या नांवाचें नाणें पाडण्याकरितां टांकसाळ घातली.

**दिल्लिरखान व जयसिंगः**—इसवी सन १६६५ त **शिवाजीनें मलबार** किनाऱ्यावरील **बारशिलोर** नामें शहर व **मक्केस** जाणारे **मुसलमान** यात्रेकरू लुटले. तेव्हां **औरंगजेबानें दिल्लिरखान** व **जयसिंग** या दोन सरदारांस **शिवाजीवर** पाठविलें. त्यावेळीं **शिवाजीचा** बंदोबस्त चांगला नव्हता, ह्मणून त्यानें कांहीं जहागीर देऊन बादशाहांची चाकरी करण्याचें कबूल केलें, व याप्रमाणें आपणावर आलेलें संकट टाळलें.

**चौथाई व सरदेशमुखीः**—हे दोन हक्क **शिवाजीनें जयसिंगा**बरोबर **विजापुरकरांच्या** मुलुखावर स्वारी करून संपादन केले.

**शिवाजीचें दिल्लीस जाणेंः**—इसवी सन १६६६ त **शिवाजी** आपला पुत्र **संभाजी** यासहित बादशाहास भेटावयाकरितां **दिल्लीस** गेला. तेथें बादशाहानें त्या उभयतांस कैदेंत ठेविलें, परंतु ते मोठ्या युक्तीनें तेथून पळून आले.

**मोहबतखानः**—इसवी सन १६७० त **शिवाजीनें तान्हाजी मालुसरा** ह्यास पाठवून **सिंहगड** किल्ला **मोंगलांकडून** परत घेतला. पण त्या लढाईत **तान्हाजी मालुसरा** पडला. त्याच वर्षी **पुरंदर** वगैरे किल्ले घेऊन **सुरत** शहर पुनः लुटलें. नंतर त्यानें **प्रतापराव गुजर** सेनापति ह्यास पाठवून **मोंगलांच्या** ताब्यांतील **खानदेश** लुटला. हें वर्तमान **औरंगजेबास** कळतांच त्यानें **मोहबतखान** नामें सरदार पाठविला. परंतु **शिवाजीनें** त्याचा पराभव करून **औरंगजेबाच्या** मुलुखावर चौथाई बसविली.

**प्रतापरावाचा मृत्यु व हंसाजी मोहितेः**—इसवी सन १६७३ त शिवाजीनें **विजापुरकरांचें हुबळी** नामें

शहर लुटून **सातारचा अजीमतारा** वगैरे किल्ले घेतले. तेव्हां **विजापुराहून** त्याच्या पारिपत्यास सैन्य आलें, त्याचा **प्रतापरावानें** मोड केला, परंतु तें लष्कर लुटण्याची संधि सांपडली असतां त्यानें तें लुटलें नाहीं; ह्मणून **शिवाजी** त्याला कांहीं टाकून बोलला. त्यामुळें **प्रतापरावास** राग येऊन तो **विजापुरकरांच्या** सैन्यावर जाऊन पडला, परंतु सैन्याचा बंदोबस्त बरोबर नसल्यामुळें तो प्राणास मुकला व सैन्य पळूं लागलें, इतक्यांत **हंसाजी मोहिते** नामें सरदारानें **विजापुरकरांच्या** सैन्यावर पडून त्याचा मोड केला. तेव्हां **शिवाजीनें** त्याचें **हंबीरराव मोहिते** असें नवें नांव ठेवून तो सेनापति केला.

**शिवाजीस राज्याभिषेकः—शिवाजीनें** इसवी सन १६७४ ह्या वर्षी जूनच्या ६ वे तारखेस मोठ्या समारंभानें **रायगडावर काशीकर गागाभट्टाकरवीं** आपणास राज्याभिषेक करविला; आणि वसूल वगैरे घेण्याचे उत्तम नियम ठरवून, राज्याच्या व्यवस्थेकरितां आठ प्रधान नेमिले होते. त्यांचे किताब व कामें येणेंप्रमाणें:—

| | **किताब.** | **कामें.** |
|---|---|---|
| १ | पेशवा अथवा मुख्य प्रधान. | मुख्य दिवाणगिरी. |
| २ | पंत अमात्य.................. | जमाबंदी व खर्चाची चौकशी. |
| ३ | पंत सचीव.................. | दप्तरदारी व बारनिशी. |
| ४ | मंत्री .................... | खासगी शिबंदीची व्यवस्था, व वाकनिशी. |
| ५ | सेनापति.................. | फौजेची व्यवस्था. |
| ६ | सुमंत .................... | परराज्याशीं वकिली करणें. |
| ७ | न्यायाधीश .................. | न्याय करणें. |

८ पंडितराव.................. शास्त्रार्थ सांगणें.

**शिवाजीची कर्नाटकावर स्वारीः**–इ०स० १६७७त **शिवाजीनें कर्नाटका**वर स्वारी करून आपला भाऊ **व्यंकोजी** याजपासून आपल्या बापाच्या जाहागिरीचा वांटा घेतला.

**शिवाजीचा मृत्युः–शिवाजी**ला गुडघी नांवाचा रोग होऊन तो इ०स० १६८०त **रायगडा**वर मृत्यु पावला त्या वेळेस त्याचें वय ५३ वर्षांचें होतें. त्याची पहिली बायको **सईबाई** हिजपासून **संभाजी** आणि दुसरी **सोयराबाई** हिजपासून **राजाराम** असे त्याला दोन पुत्र होते.

**शिवाजीचे गुणः**–त्याच्या आंगीं चातुर्य, शौर्य, दक्षता वगैरे अनेक उत्तम गुण होते; ह्मणूनच त्यानें केवळ रानटी लोकांच्या साह्यानें स्वतंत्र राज्याची स्थापना केली.

**त्याचा राज्यविस्तारः–शिवाजी**च्या ताब्यांत सारें **कोंकण, पुणें** प्रांत आणि **कर्नाटकां**तील कांहीं प्रांत इतके होते. त्याच्या राज्यांत डोंगरी किल्ले पुष्कळ होते. त्यांत **रायगड** आणि **प्रतापगड** हे मुख्य होते.

**संभाजीः**–(इ० स० १६८०–१६८९.) हा **शिवाजी**च्या मागून गादीवर बसला. त्या वेळेस त्याचें वय २३ वर्षांचें होतें.

**त्याचा स्वभावः**–हा कांहींसा आपल्या बापासारखा शूर होता परंतु स्वभावेनें अत्यंत क्रूर व दुर्व्यसनी असल्यामुळें तो लोकांस आवडेना, ह्मणून त्यांनीं **राजारामास** गादीवर बैसविण्याविषयीं यत्न चालविला. हें त्यास समजतांच त्यानें त्या लोकांस व **राजारामाचे** आईस ठार मारून **राजारामास** बंदींत टाकिलें.

**त्यांची राज्यरीति व दुर्वर्तन यांचा परिणामः**– पूर्वीचे शहाणे प्रधान काढून त्यानें **कलुशा** नामक एक **कनोजी** ब्राह्मण होता त्याजकडे सर्व राज्यकारभार सोंगितला. त्यामुळें राज्यांत अव्यवस्था झाली. ही संधि साधून **औरंगजेबानें** दक्षिणेंत स्वारी केली. एके वेळीं **संभाजी संगमेश्वराजवळ** शिकारीस गेला असतां त्यास **मोंगलांनीं** कैद करून **तुळापुरीं नेलें,** व इ० स० १६८९ त हाल हाल करून ठार मारिलें. त्याची बायको **येसूबाई** व पुत्र **शिवाजी** ह्यांस **औरंगजेबानें** धरून आपल्या ताब्यांत ठेविलें.

**राजारामः**–( इ० स० १६८९–१७००.) **संभाजी** मरण पावल्यावर त्याचा पुत्र **शिवाजी** (शाहू) हा गादीवर बसावा, परंतु त्यास व त्याचे आईस **मोंगलांनीं** कैदेंत ठेविलें होतें, ह्मणून कित्येक **मराठे** सरदारांनीं **राजाराम** यास गादीवर बसविलें. यानें **सातारा** येथें आपली गादी स्थापिली. **प्रल्हाद निराजी** ह्मणून एक ब्राह्मण राजकीय कामांत चतुर व निस्पृह होता. त्यानें सरकारचीं फार मोठमोठीं कामें केलीं होतीं ह्मणून त्यास **पंतप्रतिनिधि** असा किताब देऊन तो अष्टप्रधानांपेक्षां वरिष्ठ केला. **संताजी घोरपडे** सेनापति ह्यानेंही पुष्कळ पराक्रमाचीं कृत्यें केलीं, ह्मणून त्यास जरीपटका या नांवाचें नवें निशाण दिलें. त्याच्या कारकीर्दींत **धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे** वगैरे पराक्रमी सरदार उदयास येऊन त्यांनीं मोठ्या पराक्रमानें **मोंगलांस** जेरीस आणिलें व **मराठ्यांचा** उत्कर्ष केला. हा **सिंहगडावर** इ०स० १७०० त मरण पावला. हा कांहींसा शूर होता परंतु राजकीय कामांत चतुर नव्हता. ह्याचे आंगीं दया व दातृत्व हे गुण मुख्य होते. याला **ताराबाई** व

**राजसबाई** अशा दोन बायका असून **ताराबाई**पासून **शिवाजी** व **राजसबाई**पासून **संभाजी** असे दोन पुत्र झाले. ह्याच्या मागें ह्याची बायको **ताराबाई** हिनें आपला पुत्र **शिवाजी** ह्यास गादीवर बसविलें. **राजाराम** मेल्यावर **औरंगजेबानें मराठ्यांचें** राज्य बुडविण्याविषयीं पराकाष्ठा केली, परंतु त्याचा बेत सिद्धीस न जातां तो इ० स० १७०७ ह्या वर्षीं **अहमदनगर** येथें मृत्यु पावला.

**दुसरा शिवाजी**:–( इ० स० १७००–१७०८. ) **राजाराम** मरण पावल्यावर त्याची बायको **ताराबाई** हिनें आपला पुत्र **शिवाजी** हा १० वर्षांचा असतांच त्यास गादीवर बसवून राज्यकारभार चालविला. नंतर **शाहूराजा**पासून पराभव पावून ती आपल्या मुलासहित **कोल्हापुरास** गेली व तेथें तिनें एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली. हल्लींचा **कोल्हापुर**चा राजा हा त्याच्याच वंशांतला आहे.

**शाहूराजा**:–( इ० स० १७०८–१७४९. ) **शाहू** व त्याची आई हीं कैदेंत असतां त्यांस **औरंगजेबानें** फार चांगल्या रीतीनें वागविलें, व आपल्या पदरच्या दोघां **मराठे** सरदारांच्या मुलींशीं त्याचीं लग्नें करून दिलीं, व त्यास कांहीं जहागीरही दिली. ह्याचें पूर्वीचें नांव **शिवाजी** असें होतें परंतु तो कैदेंत असतां **औरंगजेब**, त्याचा आजा **शिवाजी** याला **शिवाजी लुटारू** आणि ह्याला **शिवाजी शाहू** ( साव ) असें ह्मणे. ह्यावरून त्याचें नांव **शाहू** पडलें.

**शाहूस राज्यप्राप्ति**:–**शाहू** कैदेंतून सुटल्यावर दक्षिणेंत येऊन तो **ताराबाई**पाशीं आपली गादी मागूं लागला; परंतु ती देईना. शेवटीं लढाई करून तिचा पराभव केला, व आपण इ० स० १७०८ त गादीवर बसला.

**अक्कलकोटच्या राजांचा मूळपुरुषः–शाहू** राजा **ताराबाईशीं** लढत असतां एका बाईनें आपला मुलगा त्याच्या पायांवर टाकिला. त्याचा त्यानें प्रतिपाळ केला; व **फत्ते-सिंग भोंसले** असें नांव ठेवून त्यास **अक्कलकोटचा** राजा केला. हाच **अक्कलकोटच्या** राजांचा मूळपुरुष होय.

**शाहूची राज्यव्यवस्थाः–शाहू** राजा राज्य करूं लागला तेव्हां राज्यांत फार अव्यवस्था होती. **धनाजी जाधव** ह्यानें **आबाजी पुरंदरे** व **बाळाजी विश्वनाथ** यांस आपल्या हाताखालीं ठेवून वसुलाचें काम चालविलें होतें. पुढें **शाहूनें पेशवाईचें** काम **बहिरोपंत पिंगळे** याज-कडून काढून **बाळाजी विश्वनाथास** दिलें. **शाहू** राजा इ० स० १७४९ त आपल्या वयाच्या ६६ व्या वर्षी मरण पावला. हा सर्व राज्यकारभार प्रधानावर सोंपवून आपण ऐषआरामांत निमग्न असे. याच्या मागें **ताराबाईचा** नातू **रामराजा** यास दत्तक देऊन गादीवर बसविलें.

**रामराजाः**–(इ० स० १७४९–इ० स० १७७७.) याच्या कारकीर्दीपासून सर्व सत्ता **पेशव्यांच्या** हातीं आली. हा इ० स० १७७७ त मरण पावला. हा निपुत्रिक होता. म्हणून **शिवाजीच्या** पणजाच्या वंशांतील एक पुरुष दत्तक देऊन गादीवर बसविला, आणि त्याचें नांव **शाहू महाराज** असें ठेविलें.

**दुसरा शाहूः**–(इ० स० १७७७–इ०स० १८०८.) हाही **रामराजाप्रमाणें** परतंत्रपणांत काळ घालवून इसवी सन १८०८ ह्या वर्षी मरण पावला. ह्याला दोन पुत्र होते. एकाचें नांव **प्रतापसिंह** आणि दुसऱ्याचें **शाहाजी**.

**प्रतापसिंह**:-(इ० स० १८०८-इ०स०१८३९.) हा सुमारें १० वर्षेपर्यंत **सातारचे** किल्ल्यांत **पेशव्यांचे** कैदेंत होता. पुढें इ० स० १८१८ त **इंग्लिशांनीं पेशव्यांचें** राज्य घेतलें, तेव्हां त्यांनीं त्याला थोडासा मुलूख देऊन गादीवर बसविलें. परंतु इ० स० १८३९ त त्यावर फितुरीचा दोष आल्यामुळें **इंग्रज** सरकारानें त्यास गादीवरून काढून त्याचा धाकटा भाऊ **शाहाजी** यास गादीवर बसविलें.

**शाहाजी**:-(इ० स० १८३९-इ० स० १८४८.) ह्याला **इंग्रज** सरकारानें इ० स०१८३९ त गादीवर बसविलें. तो इ० स० १८४८ ह्या वर्षी मरण पावला. त्याला संतान नव्हतें, व त्याच्या वंशांत दुसरा कोणी वारस नव्हता; ह्मणून तें राज्य **इंग्रज** सरकारानें खालसा केलें. यप्रमाणें **मराठी** राज्याचा शेवट झाला.

---

## भाग ३.

### पेशव्यांचें वर्णन.

**बाळाजी विश्वनाथ**:-(इसवी सन १७१४-इसवी सन १७२०.) हा **कोंकणांत श्रीवर्धन** ह्मणून गांव आहे तेथील कुळकरणी होता. **शाहूराजाच्या** कारकीर्दींत **धनाजी जाधव** यानें त्यास आपल्या हाताखालीं वसुलाचे कामावर कारकून नेमिलें. पुढें **धनाजी जाधव** मेल्यावर त्याचें काम **बाळाजी विश्वनाथ** पाहूं लागला. त्या कामांत त्याच्या आंगची विलक्षण अक्कल व पोंच पाहून **शाहू राजाचें**

त्याच्यावर प्रेम जडत चाललें. पुढें **कृष्णराव खटावकर** नांवाचा **मोंगलांचे** आश्रयानें वाढलेला कोणी **ब्राह्मण** यानें **शाहू**चे मुलुखांत उपद्रव केला, त्यावर **शाहूनें बाळाजी विश्वनाथा**स सैन्यासह पाठविलें. त्यानें लढाई करून **कृष्णरावा**चा अगदीं पराभव केला. ह्याच वेळीं **कान्होजी आंग्रे कोंकणां**त **शाहूच्या** मुलुखावर स्वाऱ्या करीत होता. ह्मणून **शाहूनें** त्यावर **बहिरोपंता**स पाठविलें. **आंग्र्यानें** त्याचा पराभव करून त्यास कैद केलें, ह्मणून **बाळाजी विश्वनाथ** यास **शाहूनें** सैन्य देऊन पाठविलें. त्यानें जाऊन **आंग्र्या**चा पराभव करून **बहिरोपंता**ची सुटका केली. यावरून **शाहू** राजा फार संतुष्ट होऊन त्यानें **पेशवाई**चा अधिकार **बहिरोपंत पिंगळे** यांजकडून काढून इ० स० १७१४ त **बाळाजी विश्वनाथा**स दिला.

**दिल्ली**मध्यें **सय्यद** ह्मणून दोघे बंधु **मुसलमान** सरदार होते; त्यांचें व **दिल्ली**चा बादशहा **फरुकशर** याचें वांकडें पडल्यामुळें त्यांनीं **मराठ्यां**ची मदत मागितली. **शाहूनें बाळाजी विश्वनाथा**स त्यांच्या मदतीस पाठविलें; या मदतीबद्दल **मराठ्यां**स फौजेचा खर्च व दक्षिणेंतील चौथाई, सरदेशमुखी, **शिवाजी**नें मिळविलेला दक्षिणेंतील मुलूख आणि कांहीं प्रांत इतकें मिळालें. **फरुकशर** मारला गेला, व **सय्यदां**स जय मिळाला.

**निजाम उल्मुलुखः**—हा **बाळाजी विश्वनाथा**च्या कारकीर्दींत **दिल्ली**च्या बादशहाचे ताब्यांतील **गुजराथ** व **माळवा** ह्या प्रांतांचा अधिकारी होता. त्यानें त्या दोघां **सय्यद** बंधूंपैकीं धाकट्यास मारून व थोरल्यास कैद करून आपण बादशहाची वजिरी मिळविली. परंतु पुढें त्याचा

व बादशहाचा बेबनाव झाल्यामुळें तो तें काम सोडून दक्षिणेंत आला; आणि त्यानें तेथें **स्वतंत्र** राज्याची स्थापना केली. हा **हैदराबाद** येथील **निजामशाही** घराण्याचा मूळपुरुष होय.

**बाळाजी विश्वनाथः**—हा इ० स० १७२० ह्या वर्षी **सासवड** येथें मृत्यु पावला. त्याला दोन मुलगे होते. वडील पुत्राचें नांव **बाजीराव** आणि धाकट्याचें नांव **चिमणाजी आपा.**

**पहिला बाजीरावः**—( इ० स० १७२०—इ० स० १७४०. ) ह्याला इ० स० १७२१ च्या एप्रिल महिन्यांत **पेशवाईचीं** वस्त्रें मिळालीं. ह्यानें **खानदेशांत** स्वारी करून तेथील मोकासपणाचा वसूल घेतला, व इ० स० १७२६—२७ ह्या वर्षी **माळव्यांत** स्वाऱ्या करून पुष्कळ द्रव्य आणिलें. इ० स० १७२८ त **निजाम उल्मुलुखावर** स्वारी करून त्याचा पराभव केला. **त्रिंबकराव दाभाडा** व **बाजीराव** यांचें वांकडें असल्यामुळें **निजाम उल्मुलुखानें** त्याला **बाजीरावाचा** मोड करण्याच्या कामीं मदत करण्याचें कबूल केलें. या भरंवशावर **दाभाडा** फौज घेऊन युद्धास आला. त्याची व **बाजीरावाची बडोदें** आणि **दुभाई** ह्यांच्यामध्यें गांठ पडून मोठी लढाई झाली. तींत **त्रिंबकराव** गोळी लागून पडला (इ० स० १७३१). ह्यानें इ० स० १७३३ त **बुंदेलखंडांत** स्वारी करून **मोंगलांचा** पराभव केला; व त्याबद्दल त्याला **बुंदेलखंडचा** राजा **चतुरसाल** याजकडून सव्वादोन लक्षांचा मुलूख मिळाला. इ० स० १७३५ त **जंजिऱ्यावर** स्वारी करून **सिद्धी रहिमान** यास गादीवर

बसविलें. ह्याबद्दल त्यानें **मराठ्यांस** अकरा महालांचें अर्धे उत्पन्न देऊन **रायगड, तळें, घोसाळें, उचितगड** आणि **विरवाडी** हे किल्ले दिले. इ० स० १७३६ त **दिल्लीवर** स्वारी करून बादशहापासून आपल्या इच्छेप्रमाणें तह करून घेतला. इ० स० १७३७ त **पोर्तुगीज** लोकांवर स्वारी करून **साष्टी** वगैरे किल्ले घेतले. इ० स० १७३८ त **निजाम उल्मुलुखावर** स्वारी करून त्यापासून सारा **माळवा** प्रांत व **नर्मदा** आणि **चंबळा** ह्या दोन नद्यांमधील सगळा मूलूख ह्यांचें आधिपत्य मिळविलें.

**चिमणाजी आपाः**–हा **बाजीरावाचा** बंधु. हा मोठा पराक्रमी, शूर व शहाणा असा होता. हा आपल्या भावास युद्धाचे कामीं चांगली मदत करीत असे. त्यानें इ० स० १७३९ त **पोर्तुगीज** लोकांपासून **वसईचा** किल्ला मोठ्या शूरपणानें लढून घेतला.

**नादिरशहाः**–हा **इराणचा** बादशाह. ह्यानें इ० स० १७३९ **दिल्लीवर** स्वारी करून बादशहास कैद केलें; व सुमारें दहा हजार लोकांचा वध करून सत्तर कोट रुपयांची लूट जमा केली, व बादशहास पुनः गादीवर बसवून आपण **इराणास** परत गेला.

**बाजीरावाच्या** कारकीर्दींत **शिंदे, होळकर, गायकवाड** आणि **भोंसले** हे सरदार प्रसिद्धीस आले. त्या प्रत्येकाचें अनुक्रमानें वर्णन करितों.

**राणोजी शिंदाः**–हा **साताऱ्याजवळ कण्हेरखेड** म्हणून गांव आहे तेथील पाटील होता. ह्यानें **मोंगलांच्या** दरबारांत मोठी अब्रू मिळविली होती; परंतु त्याला गरिबी आल्यामुळें त्यानें **बाळाजी विश्वनाथाजवळ** बारगिरीचें

काम पत्करिलें. पुढें कांहीं दिवसपर्यंत तो **बाजीरावा**जवळ हुजऱ्या होता. त्यानें त्याचे उत्तम गुण पाहून त्याला मोठ्या योग्यतेस चढविलें. हा इ० स० १७५० त मरण पावला. यास **जयाजी, जनकोजी** आणि **दत्ताजी** हे औरस पुत्र, आणि **महादजी** व **तुकोजी** हे दासीपुत्र होते.

**मल्हारराव होळकरः**—हा **निरा** नदीच्या कांठीं **होळ** ह्मणून खेडें आहे तेथील **दुय्यम** पाटील असून **बाजीरावा**-जवळ शिलेदारीचें काम करीत असे. **बाजीरावानें माळ-व्यांत** स्वारी केली, त्या वेळीं तो स्वपराक्रमानें लौकिकास चढला. हा इ० स० १७६६ त मरण पावला. ह्याला **खंडेराव** ह्मणून एकच पुत्र होता; परंतु तो आपल्या बापाच्या पूर्वींच निवर्तला होता, ह्मणून त्याची बायको **अहिल्याबाई** व पुत्र **मालेराव** हीं राज्याचीं मालक झालीं.

**दमाजी गायकवाडः**—हा सेनापति **खंडेराव दाभाडे** ह्याचे हाताखालीं एक हलक्या प्रतीचा सरदार होता; त्याचा पराक्रम पाहून **शाहूराजानें** त्याला मोठा अधिकार व 'समशेर बहादर' हा किताब दिला.

**रघोजी भोंसलेः**—हा **परसोजी भोंसल्याच्या** वंशांतील होता. हा शिकारीचे कामांत हुशार असल्यामुळें **शाहू**ची त्याजवर मर्जी बसली; आणि त्यानें त्याला 'सेनासाहेब सुभा' हा किताब व **वऱ्हाड** प्रांताची सुभेदारी दिली.

**बाजीराव** हा मोठा शूर, राज्यकारभारांत अत्यंत निपुण व प्रयत्नी असा होता. हा **हिंदुस्थानांत** स्वारीस जात असतां इ० स० १७४० त **नर्मदेच्या** कांठीं मृत्यु पावला. ह्याला **बाळाजीपंत** ऊर्फ **नानासाहेब, रघुनाथराव** आणि

**जनार्दनपंत** असे तीन पुत्र, व यवनीपासून झालेला **समशेर बहादर** असे चार पुत्र होते.

**बाळाजी बाजीराव** ऊर्फ **नानासाहेब**:–( इ० स० १७४०–१७६१. ) **रघोजी भोंसले** याच्या मनांत **बाबूजी** नाईक **बारामतीकर** याला **पेशवाईचा** अधिकार मिळावा असें होतें, परंतु त्याचा हेतु सिद्धीस न जातां तो **नानासाहेबासच** मिळाला, त्यामुळें **रघोजीनें नानासाहेबाशीं** वैर मांडिलें. नंतर **शाहूनें** मध्यस्थी करून उभयतांचा तंटा मिटविला.

**राज्यव्यवस्था**:—**नानासाहेबानें** आपला धाकटा भाऊ **रघुनाथराव** याजकडे संपूर्ण फौजेचें काम सांगून आपला चुलत भाऊ **सदाशिवराव भाऊ** याजवर सर्व राजकीय काम सोंपविलें होतें. **सदाशिवराव भाऊ** हा आपल्या बापासारखा शूर व शहाणा होता. त्यानें **रामचंद्र मल्हार सुकठणकर** सारस्वत ब्राह्मण ऊर्फ **रामचंद्रबावा शेणवई** याचे मदतीनें उत्तम प्रकारची राज्यव्यवस्था केली व उत्तम नियम ठरविले.

**अहमदशाहाअबदाली**:–हा **अफगाण** लोकांचा बादशहा. यानें इ० स० १७४८ त **हिंदुस्थानांत** स्वारी केली. त्याला **दिल्लीच्या** बादशहाचा मुलगा **अमेदशाह** यानें मागें हटविलें.

इ० स० १७४८ त **निजाम उल्मुलुख** मरण पावला. तेव्हां त्याच्या मुलांपैकीं **सलाबतजंग** गादीवर बसला. पुढें त्याचा भाऊ **निजामअल्ली** यानें त्याला कैद करून आपण गादीवर बसला.

**पुणें राजधानी**:–**रामराजास** गादीवर बसविल्यावर

**नानासाहेबानें** इ० स० १७५० ह्या वर्षी **पुणें** शहर **मराठी** राज्याची राजधानी केलें.

इ० स० १७५३ ह्या वर्षी **नानासाहेबानें** स्वतः **कर्नाटकावर** स्वारी करून तेथची व **श्रीरंगपट्टणाची** खंडणी घेतली व **हुबळी** नामक किल्ला आपल्या हस्तगत करून घेतला.

इ० स० १७५५ त **रघुनाथरावानें गुजराथ** व **अजमीर** प्रांतांवर स्वारी करून **अमदाबाद** घेतली. त्याच वर्षी **इंग्रजांचे** मदतीनें **नानासाहेबानें आंग्र्यांचे विजयदुर्ग** वगैरे किल्ले घेतले, व त्या मदतीबद्दल त्यांस **बाणकोट** व त्याच्या भोंवतालचे नऊ गांव दिले.

इ० स० १७५८ त **रघुनाथरावानें पंजाब** प्रांतावर स्वारी करून **मुलतान** व **लाहोर** येथें आपला अंमल बसविला.

**उदगीरची लढाई**:—**अहमदनगर** शहर तेथील किल्लेदारानें **पेशव्यांच्या** स्वाधीन केलें होतें, तें परत घेण्याकरितां ही लढाई **भाऊसाहेब** व **निजामअल्ली** यांमध्यें इ० स० १७६० त झाली. तींत **मोंगलांचा** पराभव होऊन **पेशव्यांस** ६२ लक्षांचा मुलूख मिळाला.

**अहमदशाहा अबदालीची स्वारी**:—इ० स० १७६० त **रघुनाथरावानें मुलतान** व **लाहोर** हे प्रांत घेतल्यामुळें **अहमदशाहा अबदालीनें हिंदुस्थानावर** स्वारी केली, आणि **मराठ्यांस पंजाबांतून** हाकून लावून **दत्ताजी शिंद्यास** ठार मारिलें. हें वर्तमान **नानासाहेबांस** कळतांच त्यानें **सदाशिवराव भाऊ** व आपला पुत्र **विश्वासराव** यांजबरोबर सैन्य देऊन तिकडे पाठविलें.

**पानपतची लढाई:**–ही लढाई **अहमदशाहा अबदाली व मराठे** यांजमध्यें ता० ७ जानेवारी सन १७६१ रोजीं झाली. तींत **विश्वासराव, सदाशिवराव भाऊ, मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदा, दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदेले** वगैरे सरदार होते. **विश्वासराव** गोळी लागून पडला तेव्हां **भाऊसाहेब** घोड्यावर बसून युद्धाचे गर्दींत शिरला, तो पुनः दिसला नाहीं. ह्या लढाईत **मराठ्यांचा** पराभव होऊन त्यांचा फार नाश झाला. **अबदालीचें** निवडक सैन्य ४९,८००स्वार व ३८,००० पायदळ असून ७७ तोफा होत्या. **मराठ्यांचें** सैन्य ५५ हजार स्वार व १५ हजार पायदळ, इतकें असून २०० तोफा होत्या. शिवाय पेंढारी व बाजारबुणगे मिळून दोन लक्ष होतें. त्यांपैकीं सुमारें चतुर्थांश लोक परत आले व बाकीचीं सुमारें दोन लक्ष मनुष्यें ठार मेलीं.

**नानासाहेबाचा मृत्यु व त्याचे पुत्र:**–**पानपत**च्या लढाईचें दुःखकारक वर्तमान ऐकून तो दिवसेंदिवस क्षीण होत चालला. शेवटीं **पुण्याजवळ पर्वती**च्या देवालयांत तो इ० स० १७६१ च्या जून महिन्यांत मृत्यु पावला. त्याला **विश्वासराव, माधवराव,** आणि **नारायणराव** असे तीन पुत्र होते.

**त्याचा स्वभाव:**–हा राजकीय कामांत चतुर होता, परंतु कपटी असे. तो चैनबाज असून त्याला कामकाज करण्याचा कंटाळा असे.

**पहिला माधवराव:**–( इसवी सन १७६१–इसवी १७७२ ) **नानासाहेब** मरण पावल्यावर त्याचा पुत्र

**माधवराव** ह्यास इ०स० १७६१ ह्या वर्षी सप्तंबर महिन्यांत **पेशवाई**चीं वस्त्रें मिळालीं. त्या वेळीं त्याचें वय १७ वर्षांचें होतें. **माधवराव** लहान होता म्हणून सर्व कारभार **रघुनाथराव**च चालवीत होता. पुढें **रघुनाथरावा**च्या मनांत आपणास राज्याचा अर्धा हिस्सा असावा, असें आल्यावरून त्याचें व **माधवराव** ह्याचें वैमनस्य पडलें; म्हणून **माधवरावा**नें तो व त्याचा स्नेही **सखाराम बापू** ह्यांस राज्यकारभारांतून दूर केलें. तेव्हां तो **मोंगलां**च्या आश्रयानें युद्ध करावयास आला; तथापि **माधवरावा**नें त्यास मोठ्या युक्तीनें वश करून घेतलें. परंतु तो पुढें बिथरला, तेव्हां त्याच्या फौजेचा मोड करून त्यास **पुण्यां**त बंदोबस्तांत ठेविलें.

**त्याची राज्यव्यवस्थाः**—यानंतर **माधवरावा**नें **त्रिंबकराव मामा पेठे** ह्यास मुख्य कारभारी नेमून राज्याची व्यवस्था उत्तम प्रकारें चालविली. **रामशास्त्री प्रभुणे** म्हणून एक मोठा विद्वान्, न्यायी, अत्यंत निष्पक्षपाती व निस्पृह असा देशस्थ ब्राह्मण होता, त्यास त्यानें न्याय करण्याचे कामावर नेमिलें. त्याच्या कारभाऱ्यांत **बाळाजीपंत भानू** ज्यास **नाना फडनवीस** असें म्हणत, तो फडनविशीचे कामावर होता. तो मोठा अक्कलवान्, दूरदृष्टि, व राज्यकारभारांत अत्यंत निपुण असा होता. त्याकडे हें काम **नानासाहेबा**च्या वेळेपासून होतें.

**माधवरावा**च्या कारकीर्दींत **ह्मसूर** प्रांतांत **हैदरअली** ह्या नांवाच्या मुसलमान सरदारानें एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली, व तो **मराठ्यां**शीं लढूं लागला. परंतु **माधवरावा**चें शौर्य व चातुर्य यांपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. **माधवराव** हा मोठा शूर असून राजनीतींत अत्यंत चतुर,

प्रामाणिक व धैर्यवान् असा होता. गरीब लोकांच्या सुखाविषयीं तो फार झटत असे. हा इ० स० १७७२ ह्या वर्षी **थेऊर** येथें मृत्यु पावला. त्या वेळीं त्याचें वय २८ वर्षांचें होतें. त्याला संतान नव्हतें. त्याची स्त्री **रमाबाई** ही त्याबरोबर सती गेली.

**नारायणराव** आणि **रघुनाथराव**:–( इ० स० १७७२–इ० स० १७७४.) थोरल्या **माधवरावा**नंतर त्याचा धाकटा भाऊ **नारायणराव** ह्यास **पेशवाई**चीं वस्त्रें मिळालीं. त्या वेळेस त्याचें वय १७ वर्षांचें होतें. **नारायणराव** आणि **रघुनाथराव** यांचें प्रथम कांहीं दिवस सख्य होतें. परंतु **नारायणरावा**ची आई **गोपिकाबाई** व **रघुनाथरावा**ची बायको **आनंदीबाई** ह्यांचें पडेना; सबब त्या दोघांमध्यें द्वेष उत्पन्न होऊन **नारायणरावानें** **रघुनाथरावास** बंदोबस्तांत ठेविलें.

**नारायणरावानें** **पेशवाई**चें काम सुमारें आठ महिने केल्यावर इ० स० १७७३ ह्या वर्षी आगष्ट महिन्यांत एके दिवशीं कांहीं गारदी लोक आपल्या पगाराची बाकी मागण्याच्या निमित्तानें वाड्यांत शिरून दांडगाई करूं लागले. त्यांपैकीं **सुमेरशिंग** नांवाच्या गारद्यानें **नारायणरावा**च्या आंगावर जाऊन त्यास व त्याचा हुजऱ्या ह्यास ठार मारिलें. हें अघोर कृत्य **रघुनाथरावानें** करविलें असावें, असा सर्व कारभारी लोकांस संशय आल्यावरून **नारायणरावा**ची स्त्री **गंगाबाई** गरोदर होती तिला त्यांनीं **पुरंदरा**वर नेऊन ठेविलें.

**नारायणराव** मारला गेल्यावर **रघुनाथराव** **पेशवाई**चें काम पाहूं लागला. परंतु **नारायणरावास** **रघुनाथ-**

**रावा**नेंच मारविलें याविषयीं कारभारी लोकांची पूर्ण खात्री झाल्यावर, त्यांनीं त्याला पदच्युत करून, **गंगाबाई**च्या नांवानें राज्यकारभार चालविला. पुढें थोडक्याच दिवसांनीं तिला पुत्र झाला. त्याचें नांव **माधवराव** असें ठेवून त्याच्या नांवाची द्वाही चोंहीकडे फिरविली.

**सवाई माधवरावः**–( इ० स० १७७४–१७९६ ) हा सन १७७४ ह्या वर्षीं एप्रिल महिन्यात जन्मला. त्यानंतर चाळिसावे दिवशीं त्यास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. तेव्हां तो अधिकार आपणास असावा असें **रघुनाथ-रावा**च्या मनांत येऊन त्यानें **मुंबई**च्या **इंग्रजां**ची मदत मागितली, व त्याबद्दल त्यांस **साष्टी बेट, वसई** गांव व **गुजराथें**तील कांहीं प्रांत देण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें **मुंबई** सरकारानें **किटिङ्ग साहेबास** फौजेसहित **रघुनाथ-रावाचे** मदतीस पाठविलें. परंतु ही गोष्ट **कलकत्ता** सरकारास नापसंत होऊन, त्याच्या मदतीस पाठविलेलें लष्कर परत बोलाविलें, व **पेशव्यां**शीं स्नेह करण्याकरितां आपला वकील **पुण्या**स पाठविला. पुढें **पेशवे** व **इंग्लिश** यांच्यामध्यें **पुरंदर** येथें तह झाला.

**पुरंदरचा तहः**–( इ० स० १७७६ ) या तहांत असें ठरलें कीं, **साष्टी इंग्रजां**कडेसच रहावी; व त्यांनीं **रघुनाथरावा**चा पक्ष स्वीकारूं नये; आणि हा तह **रघु-नाथरावास** मान्य होईल तर त्यानें दरमहा पंचवीस हजार रुपये घेऊन **कोपरगांवीं** रहावें; परंतु **रघुनाथरावास** ती तहांतली अट मान्य न झाल्यामुळें तो दरमहा दहा हजार रुपये घेऊन **मुंबई** सरकारच्या आश्रयास राहिला.

**सदाशिवराव भाऊ तोतयाः**–**पानिपत**च्या लढाई-

नंतर सुमारें आठ नऊ वर्षांनीं **सदोबा** ह्मणून एक **कनोजा ब्राह्मण, सदाशिवराव भाऊ** तो मीच, असें प्रसिद्ध करूं लागला. त्यावरून **थोरल्या माधवरावानें** त्याची चौकशी करून त्यास कैदेंत ठेविलें होतें. तो **रत्नागिरी** येथें कैदेंत असतां तेथील सुभेदारानें त्यास सोडून देऊन, त्याला वीस हजार फौज मिळवून दिली. तेव्हां त्यानें **कोंकणां**तील सुमारें वीस किल्ले घेतले, व घांटावरील **राजमाची** किल्ला घेतला. **मुंबई** सरकारासही तो **सदाशिवराव भाऊ** आहे असें वाटून त्यांनीं त्याचा सन्मान केला. पुढें कारभारी लोकांनीं तह करण्याचा घाट घालून त्यावर हल्ला केला. तेथून तो **कुलाब्यास** पळून गेला. तेथें **रघुजी आंग्रे** यानें त्यास पकडून **पुण्यास** पाठविलें. तेव्हां **पेशव्यांनीं** त्यास हत्तीचे पायांशीं बांधून मारिलें ( इ० स० १७७६. )

**वडगांवची लढाई**:–(ता० १३ जानेवारी सन १७७९) **इंग्रजांनीं सदोबाचा** सन्मान केला, व **राघोबादादास** आपल्या आश्रयास ठेविलें, हें कृत्य **पुरंदरच्या** तहाविरुद्ध झालें ह्मणून त्या तहांत लिहिलेलें **इंग्रजांचें** कांहीं देणें राहिलें होतें तें देण्याचें **नाना** लांबणीवर टाकूं लागला व **फ्रेंच्यांच्या** वकिलास **पुण्यां**त **नानानें** पुष्कळ दिवस ठेवून घेतलें. या दोन कारणांवरून **रघुनाथरावास** गादीवर बसविण्याकरितां **इंग्रज** सरकारानें पुनः आपली फौज पाठविली. तिचा **महादजी शिंदे** व **हरिपंत फडके** यांनीं **वडगांव** मुक्कामीं पराभव केला, त्यामुळें त्यांस तहाचें बोलणें लावून परत **मुंबईकडे** जाणें भाग पडलें.

**रघुनाथरावाचा मृत्यु**:–( सन १७८४ ) **पेशवाईची**

गादी मिळविण्याविषयींचा आपला सर्व उद्योग व्यर्थ गेला, असें पाहून **रघुनाथराव पेशव्यां**च्या पूर्वीच्या ह्मणण्याप्रमाणें **कोपरगांवीं** जाऊन राहिला. तेथें तो इ०स० १७८४ ह्या वर्षीं मृत्यु पावला. त्याला **बाजीराव** व **चिमणाजी आपा** हे दोन औरस पुत्र होते, व ह्यांखेरीज **अमृतराव** ह्मणून एक दत्तक पुत्र होता.

**टिपुसुलतानः**—हा **हैदरअल्ली**च्या मागें **ह्मैसूर**च्या गादीवर बसला होता. तो **पेशव्यांचे** मुलुखांत फार उपद्रव करूं लागला; व **इंग्रजां**चा मित्र **त्रावणकोर**चा राजा ह्याच्याशींही त्यानें युद्ध केलें; ह्मणून **पेशवे, इंग्रज** व **निजाम** यांनीं एकत्र होऊन त्यावर स्वारी केली. तेव्हां **टिपूनें** तह केला. त्यांत त्यानें आपला अर्धा मुलूख व एक कोटि पासष्ट लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें. त्यांत **मराठ्यांस वर्धा** आणि **कृष्णा** ह्या नद्यांमधील मुलूख व **बिलारी**पाशीं **सोंडून** नामें खेरें आहे तें, मिळून सुमारें चाळीस लक्षांचा मुलूख मिळाला.

**महादजी शिंदाः**—ह्यानें **रजपूत** व **मोंगल** ह्यांशीं लढाया करून जय मिळविला; व तेणेंकरून **दिल्ली**च्या दरबारीं त्याचें मोठें प्राबल्य झालें. **पुण्या**मध्येंही आपलें वर्चस्व व्हावें, ह्मणून तो **नानाफडनविसा**शीं आंतून द्वेष करूं लागला. ह्याशिवाय **दिल्ली**च्या बादशहापासून **पेशव्या**करितां 'वकील मुतलक' ही पदवी मिळवून देऊन **पेशव्यांस** वश करण्याचा उद्योग चालविला. परंतु **नानानें** त्याचें मन पुन्हा आपणाकडे वळविलें. इतक्यांत **महादजीस** मोठा ज्वर येऊन तो इ०स० १७९४ च्या फेब्रुवारी महिन्याच्या १२व्या तारखेस **पुण्या**जवळ **वानवडी** मुक्कामीं मृत्यु पावला.

लेम पुनः घेऊन यहोयाकिमास ठार मारिलें. योशी याचा दुसरा एक मुलगा सिदकिया ह्मणून होता त्याचे हाताखालीं आतां थोडेच यहुदी लोक राहिले होते, तरी त्यांनीं आणखी एकदां मिसर देशाच्या राजाला बंड करण्याकरितां कुमक केली. तेव्हां नबुखद्रेस्सर ह्यानें त्यांचा अगदीं नाश करण्याचा निश्चय केला आणि यरूशालेम घेऊन त्यानें तें शहर व तेथील देवमंदिर हीं जमीनदोस्त केलीं आणि सगळ्या यहुदी लोकांला कैद करून इ. स. पू. ५८६ त बाबुलोन येथें आणिलें.

खोरेश ह्यानें इ. स. पू. ५३८ त बाबुलोन घेतलें, तोंपर्यंत यहुदी लोक अटकेंतच होते.

## सारांश.

हा वेळ तंव जें वाचिलें तें काय आहे हें आपण आतां पाहूं. युफ्रातिस व तैग्रिस ह्यांची थडी हा मध्य होय, त्यापासून शमी कुळांतले लोक चोहोंकडे कसकसे पसरले ह्याचा इतिहास हा आहे. खाल्दी देशांतील मिसळ जातीचे लोक फारसे वैभवास चढले नाहींत; परंतु शुद्ध शमी कुळांतले जे असुरीलोक होते त्यांनीं मात्र पश्चिमेकडे पुष्कळ प्रांत जिंकून घेतले. पूर्वेस मेदी नांवाचे आर्य लोक राहत होते. त्यांनीं अखेरीस ह्या असुरी लोकांचीं राज्यें बुडविलीं. पश्चिमेस शमी कुळांतले दुसरे लोक होते त्यांचे बरोबर युद्ध करण्याचे कामांत त्यांना यश आलें त्यामुळें त्यांनीं व्यापारी व वसाहत

तारखेस आपल्या वाड्यांतील तिसऱ्या मजल्यावरून कारंजावर उडी टाकिली. त्यामुळें तो तिसरे दिवशीं मृत्यु पावला.

**दुसरा बाजीराव** (इ०स० १७९६–इ०स०१८१८.) –**बाजीरावास** गादी मिळणार, हें **नाना फडनविसास** न आवडून, त्यानें इतर कारभारी लोकांच्या संमतीनें **सवाई माधवरावाच्या** बायकोच्या मांडीवर दत्तक देऊन तो **पेशवा** करावा, असें ठरविलें. हें **बाजीरावास** कळतांच त्यानें **शिंद्याचा** मुख्य कारभारी **बाळोबा तात्या** याच्या द्वारें गादी मिळविण्याविषयीं खटपट चालविली. तेव्हां ही गोष्ट **बाळोबा तात्या कुंजर** ह्याचे हातून होण्यापूर्वी आपणच करावी ह्मणून **नानानें बाजीरावास शिवनेरीहून** आणवून गादीवर बसविण्याची तयारी केली. ही गोष्ट आपल्या सल्ल्यावांचून होते हें **बाळोबा तात्यास** समजतांच त्यानें **बाजीरावास** कैद करून त्याचा धाकटा भाऊ **चिमणाजी आपा** यास गादीवर बसविलें. पुढें **नानानें दवलतराव शिंद्यास** वश करून घेतलें, व **बाळोबा तात्यास** कैद करवून **बाजीरावास** इ० स० १७९६ च्या डिसेंबरांत गादीवर बसविलें व आपण मुख्य कारभार करूं लागला.

**बाजीराव** गादीवर बसल्यावर त्यानें **नाना** व त्याच्या पक्षाचे लोक ह्यांस कारभारांतून काढून टाकण्याकरितां **शिंद्याकडून** त्यास इ० स० १७९७ त कैद करवून **अहमदनगरच्या** किल्ल्यांत नेऊन ठेविलें. पुढें **शिंद्याचें** व **बाजीरावाचें** वांकडें पडल्यामुळें **शिंद्यानें नानास** कैदेंतून सोडलें. **बाजीरावानें** पुन्हा **नानास** मुख्य कारभारी केलें, तरी **नानाविषयीं** त्याचें मन शुद्ध नव्हतें. तथापि

नानानें राज्यकारभारांत अगदीं दुर्लक्ष केलें नाहीं. शेवटीं तो इ० स० १८०० ह्या वर्षी मार्च महिन्यांत मृत्यु पावला.

**नाना फडनविसाचे गुणः**—हा लहानपणापासून राज्यकारभार करूं लागल्यामुळें त्या कामांत तो फार प्रवीण झाला होता. त्या वेळीं साऱ्या **हिंदुस्थानां**त त्याच्या इतका राजनीतींत प्रवीण दुसरा पुरुष नव्हता. हा चतुर, प्रामाणिक, स्मरणशक्तीचा धड व शहाणा होता. तो मृत्यु पावला त्या वेळीं मराठी राज्यांतील चातुर्य व प्रामाणिकपणा हीं त्याजबरोबरच गेलीं असें लोक ह्मणूं लागले.

**पुणें शहरची लूटः—बाजीरावानें** आपणास गादी मिळण्याविषयीं **शिंद्यास** दोन कोट रुपये देऊं केले होते, त्याविषयीं **शिंद्यानें** तगादा लाविला. तेव्हां **बाजीरावानें** **शिंद्यास** अशी मसलत दिली कीं, तुह्मी **सर्जेराव घाडग्याचे** द्वारें **पुण्यां**तील सावकार लोकांकडून बलात्कारें द्रव्य उत्पन्न करावें. त्यावेळीं **घाडग्यानें** निर्दयपणें लोकांचे हाल हाल करून पुष्कळ द्रव्य जमा केलें.

**यशवंतराव होळकरः**—ज्या लोकांनीं **बाजीरावा**स त्रास दिला होता, त्यांस त्यानें हाल हाल करून जिवें मारिलें. त्यांत **यशवंतराव होळकरा**चा भाऊ **विठोजी होळकर** ह्याला त्यानें हत्तीच्या पायाशीं बांधून मारविलें. हें वर्तमान **यशवंतरावा**स समजतांच, तो आपलें लष्कर घेऊन **पुण्या**वर आला, आणि **शिंद्या**च्या व **बाजीरावा**च्या सैन्याचा पराभव केला. तेव्हां **बाजीराव सिंहगडास** पळून गेला. पुढें तेथून **रायगडास** जाऊन नंतर **वसईस इंग्रजां**च्या आश्रयास राहिला. इकडे **होळकरानें अमृतरावाचा** पुत्र **विनायकराव** ह्यास **पेशव्याचे** गादीवर बसविलें. तेव्हां **बाजी-**

**रावानें** पुनः गादी मिळविण्याबद्दल **इंग्रजांची** मदत मागितली. तेव्हां त्या उभयतांमध्यें **वसई** मुक्कामीं तह झाला.

**वसईचा तहः**—हा तह **बाजीराव** व **इंग्रज** यांजमध्यें ता० ३१ डिसेंबर सन १८०२ रोजीं झाला. त्यांत असें ठरलें कीं, **इंग्रजांचें** आठ हजार सैन्य उभयतांच्या शत्रूंच्या निवारणार्थ **बाजीरावानें** आपल्या राज्यांत राहूं द्यावें; व त्याच्या खर्चाकरितां वीस लक्षांचा मुलूख **इंग्रजांस** द्यावा.

**बाजीरावास पुनः राज्य मिळतेंः**—**वसईचा** तह झाल्यानंतर **इंग्रजांनीं बाजीरावास** इ० स० १८०३ ह्या वर्षी पुनः गादीवर बसविलें; आणि **अमृतरावास** प्रतिवर्षी आठ लक्ष रुपयांची नेमणूक करून देऊन त्याला त्याच्या पुत्रासहित **काशीस** नेऊन ठेविलें. नंतर तहांतील कलमाप्रमाणें **इंग्रजांनीं** आपलें सैन्य आणून **घोड**नदीच्या कांठीं छावणी केली. त्यामुळें तेथें एक गांव वसला; त्याला **मराठे** लोक **घोडनदी** ह्मणतात, व **इंग्रज** लोक **शिरूर** ह्मणतात.

**त्रिंबकजी डेंगळाः**—हा एक जासूद होता. त्यावर **बाजीरावाची** प्रीति जडून त्यानें त्याला इतक्या योग्यतेस चढविलें कीं, **पेशव्यांच्या** दरबारांत त्याच्याशिवाय कोणतेंच काम होईनासें झालें. तो फार क्रूर होता. मक्त्यानें मामलती करणारांकडून त्यांच्या कामांत कांहीं अंतर पडल्यास त्यांस तो जिवेंही मारी.

**बाजीरावाचें दुर्वर्तनः**—**बाजीराव** गादीवर बसतांच तो लोकांस अनेक रीतींनें छळूं लागला. **रास्ते** वगैरे जहागीरदारांच्या जहागिरी जप्त केल्या, व **त्रिंबकजीच्या** मसलतीनें **इंग्रजांस** घालवून देण्याकरितां **शिंदा** व **रघूजी भोंसला** ह्यांजकडे वकील पाठवून त्याच्याशीं तह केला, आणि लुटा-

लूट करून निर्वाह करणारे जे **पेंढारी** लोक त्यांच्या मुख्या-च्याही भेटी घेऊं लागला.

**गंगाधरशास्त्री पटवर्धनः**—**गायकवाडा**कडे **पेश-व्यांच्या** खंडणीबद्दल बाकी राहिली होती, तीसंबंधीं बोलणें करण्याकरितां **गायकवाडानें** आपला वकील **गंगाधर-शास्त्री** ह्यास **पेशव्यांचे** दरबारीं पाठविलें. तो येण्यापूर्वी आपणास **त्रिंबकजीच्या** हातून कांहीं इजा होणार नाहीं अशाविषयीं त्यानें **इंग्रजांचें** अभयवचन घेतलें होतें. तथापि **बाजीरावानें** त्यास आपल्याबरोबर **पंढरपुरास** नेलें, व तेथें त्याला **त्रिंबकजी**कडून इ० स० १८१५ त ठार मारविलें. त्यानंतर **बाजीरावानें त्रिंबकजीस** निरुपायास्तव **इंग्रजांच्या** स्वाधीन केलें, परंतु तो पळून जाऊन दंगे करूं लागला.

**बाजीरावाचा इंग्रजांशीं नवा तहः**—हा तह इ० स० १८१७ त मे महिन्याच्या १० वे तारखेस झाला. त्यांतील मुख्य कलमें:—**गायकवाडा**कडे **पेशव्यांचें** जें येणें असेल त्याबद्दल तो प्रतिवर्षी चार लक्ष रुपये देईल, ते घ्यावे; **इंग्रजांच्या** लष्कराच्या खर्चाबद्दल ३४ लक्षांचा मुलूख द्यावा; **अहमदनगर किल्ला** व **नर्मदेच्या** उत्तरेकडील प्रांतांतले सारे हक्क **इंग्रजांस** द्यावे; **तुंगभद्रा** आणि **नर्मदा** ह्यांजमधील प्रांतांशिवाय इतर मुलखावर **पेशव्यांनीं** आपला हक्क सांगूं नये; आणि परराष्ट्राशीं कोणत्याच प्रकारचें दळणवळण ठेवूं नये. ह्या तहाच्या योगानें **वसईच्या** तहापेक्षां **बाजी-रावाचें** स्वातंत्र्य पुष्कळ कमी झालें.

**खडकीची लढाईः**—ह्या वरील तहामुळें **बाजीरा-वाच्या** मनांतील वैमनस्य फारच वाढत जाऊन, तो **इंग्रजांच्या** नाशाविषयीं झटून प्रयत्न करूं लागला. **बापू गोखला**

ह्मणून एक शूर सरदार होता; त्याला आपल्या सैन्यावर मुख्य नेमून लढाईची तयारी चालविली. इतक्यांत **घोडनदी**-वरील **इंग्रजांचें** लष्कर **पेंढाऱ्यांचा** दंगा मोडण्याकरितां गेलें. ही संधि साधून **बापू गोखल्यानें** इ० स० १८१७ त नोवेंबरच्या ५ व्या तारखेस **पुण्याजवळ खडकी** मुक्कामीं **इंग्रजांवर** हल्ला केला. तेव्हां कांहीं वेळ युद्ध होऊन **मराठ्यांचा** पराभव झाला, व **बाजीराव** युद्ध न करितां **साताऱ्याकडे** पळून गेला.

**कोरेगांवची लढाईः**—ही लढाई इ० स० १८१७ च्यां डिसेंबर महिन्यांत **बाजीराव** व **इंग्रज** यांजमध्यें **भीमेच्या** कांठीं **कोरेगांव** येथें झाली. तींत **इंग्रजांचे** ९०० लोक असतांही, त्यांनीं **बाजीरावाच्या** ३०,००० लोकांचा अगदीं पराभव केला. ह्या विलक्षण पराक्रमाचें स्मरण राहण्याकरितां **इंग्रजांनीं** त्या ठिकाणीं रणस्तंभ बांधून ठेविला आहे.

**अष्ट्याची लढाईः**—**कोरेगांवची** लढाई झाली, त्याच्या दुसरे दिवशीं **बाजीरावास** कळलें कीं, **स्मिथ साहेब** जवळ येऊन ठेपला. तेव्हां तो तेथून पळून जाऊन **अष्टें** मुक्कामीं उतरला. इतक्यांत **स्मिथ साहेब** तेथें आला. तेव्हां त्या उभयतांची लढाई इ० स० १८१७ च्या डिसेंबर महिन्यांत होऊन. मराठयांचा अगदीं मोड झाला. ह्या लढाईंत **बापू गोखला** शूरपणें लढत असतां मारला गेला; व **सातारचा** राजा **इंग्रजांच्या** हातीं लागला.

**बाजीराव राज्यास मुकतोः**—**बाजीराव अष्ट्याहून** पळून **नागपूरकर भोंसले** यांचा आश्रय करण्याकरितां त्यांच्या मुलखांत शिरला. तेथेंही **इंग्रजांच्या** एका टोळीनें त्याच्या बाकी राहिलेल्या सैन्याची दाणादाण केली. तेव्हां

**मालकम साहेब इंदुरा**जवळ होता, त्याला तो इ० स० १८१८ ह्या वर्षी जूनच्या ९ व्या तारखेस शरण गेला; आणि राज्याची आशा सोडून **इंग्रज** लोक ठेवितील, त्याप्रमाणें राहण्यास कबूल झाला. त्यांनीं त्याला प्रतिवर्षी आठ लक्ष रुपयांची नेमणूक करून देऊन **ब्रह्मवर्तां**त नेऊन ठेविलें. ह्याच सुमारास **त्रिंबकजी**स पकडून **काशी**जवळ **चुनारगड** नांवाचा किल्ला आहे, तेथें जन्मपर्यंत कैदेंत ठेविलें.

**सातारच्या राज्याची व्यवस्था:**—**अष्ट्या**च्या लढाईंत **सातार**चा राजा **इंग्रजां**च्या हातीं लागला, त्यास त्यांनीं मोठ्या समारंभानें **सातार**चे गादीवर बसवून **निरा** आणि **वारणा** ह्यांच्यामधील पश्चिमेस **सह्याद्री**पासून पूर्वेस **पंढरपुरा**पर्यंत प्रदेश त्याच्या स्वाधीन केला.

**बाजीरावापासून घेतलेल्या राज्याची व्यवस्था:**—**पेशव्यां**च्या दरबारीं **एल्फिन्स्टन्** नामें **इंग्रजां**चा वकील होता, त्यालाच त्या प्रांताच्या बंदोबस्ताकरितां नेमिलें. तो फार चतुर व माहितगार होता. त्यानें **पेशवे** सरकारच्या पदरचे सरदार, मुत्सद्दी व आश्रित वगैरे लोक ह्यांस आपला धनी गेल्याचें दुःख होऊं नये ह्मणून, कितीएकांस जाहागिरी दिल्या, कितीएक बडे लोकांस पेनशनें करून दिलीं; आणि कितीएकांस वर्षासनें करून दिलीं. इनामें, देवस्थानें व धर्मादाय हे खर्च पूर्वीप्रमाणेंच चालविले; बंडाळी मोडून टाकिली; आणि रयतेच्या सुखासाठीं न्यायमनसुबी चांगली व्हावी व कोणावर विनाकारण जुलूम होऊं नये असा बंदोबस्त केला. ह्या साहेबानें लोकोपयोगीं कृत्यें केलीं, ह्मणून लोक अद्यापि त्याची कीर्ति गात आहेत.

# महाराष्ट्र देशाच्या इतिहासांतील ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी.

इ० स०

७८। शालिवाहन शकाचा आरंभ.
१३४७ जाफरखानानें ब्राह्मणी राज्याची स्थापना केली.
१३९६ महाराष्ट्र देशांत दुर्गादेवी नांवाचा दुष्काळ पडला.
१४७८ ब्राह्मणी राज्यास उतरती कळा लागली.
१४९७ वास्को दि गामा कालीकोट बंदरांत आला.
१५१० पोर्तुगीज लोकांनीं गोवें शहर घेतलें.
१५२६ ब्राह्मणी राज्य मोडून त्याचीं पांच राज्यें झालीं.
१६२६ मलिकंबर मृत्यु पावला.
१६२७ शिवाजी राजा शिवनेरी किल्ल्यांत जन्मला.
१६३७ शहाजहानानें अहमदनगरचें राज्य बुडविलें.
१६४६ शिवाजीनें तोरणा किल्ला घेतला.
१६४७ दादोजी कोंडदेव मृत्यु पावला.
१६४८ शिवाजीनें कल्याणचा सुभा घेतला.
१६५६ शिवाजीनें शामराजपंतास 'पेशवा' हें पद दिलें.
१६५९ शिवाजीनें अफझुलखानास मारिलें.
१६६० विजापूरकरांचे रुस्तुमजमान व शिद्दीजोहार हे सरदार शिवाजीवर आले.
१६६१ मुंबई बेट पोर्तुगीज लोकांकडून इंग्रजांस मिळालें.
१६६२ विजापुरकरांनीं शिवाजीशीं तह केला.
१६६४ शिवाजीनें सुरत शहर लुटलें व शाहाजीचा मृत्यु.
१६६५ शिवाजीची मलबार प्रांतावर स्वारी.
१६६६ शिवाजी बादशाहास भेटण्याकारितां दिल्लीस गेला.
१६६७ औरंगजेबानें शिवाजीस 'राजा' हा किताब दिला.
१६७३ शिवाजीनें हुबळी नामें शहर लुटलें.

१६७४ शिवाजीस रायगडावर राज्याभिषेक झाला.
१६७७ शिवाजीची कर्नाटकावर स्वारी. [ण्याकरितां पाठविलें.
१६७९ औरंगजेबानें दिल्लीरखानास विजापुरचें राज्य बुडवि-
१६८० शिवाजी मृत्यु पावला व संभाजी गादीवर बसला.
१६८३ औरंगजेब फौज घेऊन दक्षिण देश घेण्याकरितां
आला. [बुडविलीं.
१६८७ औरंगजेबानें गोवळकोंडें व विजापूर हीं राज्यें
१६८९ संभाजी मारला गेला व राजाराम गादीवर बसला.
१७०० राजाराम मृत्यु पावला.
१७०७ औरंगजेब मृत्यु पावला.
१७०८ शाहूराजा गादीवर बसला.
१७०९ कोल्हापूरच्या राज्याची स्थापना.
१७१४ बाळाजी विश्वनाथास पेशवाईचा अधिकार मिळाला.
१७२० बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु.
१७२१ पहिला बाजीराव ह्यास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं.
१७२६-२७ बाजीरावाच्या माळव्यावर स्वाऱ्या.
१७२८ निजाम उल्मुलुखावर बाजीरावाची पहिली स्वारी.
१७३१ त्रिंबकराव दाभाडा व पहिला बाजीराव ह्यांची लढाई.
१७३३ बाजीरावाची बुंदेलखंडांत स्वारी.
१७३५ बाजीरावाची जंजिऱ्याच्या शिद्दीवर स्वारी.
१७३६ बाजीरावानें दिल्लीवर स्वारी केली. [पराभव केला.
१७३७ बाजीरावानें कोंकणांत जाऊन पोर्तुगीज लोकांचा
१७३८ बाजीरावाची निजाम उल्मुलुखावर दुसरी स्वारी.
१७३८ नादिरशाहाची दिल्लीवर स्वारी.
१७३९ चिमणाजी आपानें वसईचा किल्ला घेतला. [बसला.
१७४० पहिला बाजीराव मृत्यु पावला, व नानासाहेब गादीवर

१७४८ अहमदशहा अबदालीची दिल्लीवर स्वारी व निजाम-
उल्मुलुखाचा मृत्यु.
१७४९ शाहुराजा मृत्यु पावला, व रामराजा गादीवर बसला.
१७५०. पुणें शहर पेशव्यांची राजधानी झाली. [तजंग बसला.
१७५१ हैदराबादचे गादीवर निजामउल्मुलुखाचा पुत्र सलाब-
१७५३. नानासाहेबाची कर्नाटकांत स्वारी.
१७५५ रघुनाथरावानें गुजराथेंत स्वारी करून अहमदाबाद
शहर घेतलें, व नानासाहेबाची आंग्र्यांवर स्वारी.
१७५८. रघुनाथरावाची हिंदुस्थानांत दुसरी स्वारी.
१७६० हैदराबादचा नबाब व भाऊसाहेब यांचें युद्ध, व
अहमदशहा अबदालीची मराठ्यांवर स्वारी.
१७६१ पानपतच्या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला,
नानासाहेब मृत्यु पावला, व थोरला माधवराव
गादीवर बसला. [दीवर बसला.
१७७२ थोरला माधवराव मृत्यु पावला, व नारायणराव गा-
१७७३ नारायणराव मारला गेला, व रघुनाथरावास पेशवा-
ईचा अधिकार मिळाला. [मिळाली.
१७७४ सवाई माधवराव जन्मला, व त्याला पेशवाईची वस्त्रें
१७७६ सदाशिवराव भाऊ तोतया याला हत्तीच्या पायांशीं
बांधून मारिलें. [बसला.
१७७७ रामराजा मृत्यु पावला, व शाहू महाराज गादीवर
१७७९ वडगांवच्या लढाईत मराठ्यांनीं इंग्रजांचा पराभव
१७८४ रघुनाथराव कोपरगांवीं मृत्यु पावला. [केला.
१७९४ महादजी शिंदा वानवडी येथें मृत्यु पावला.
१७९५ पेशवे व निजाम यांची खरडें येथें लढाई, व सवाईमाध-
१७९६ दुसरा बाजीराव गादीवर बसला. [वरावाचा मृत्यु.

…ना फडनवीस केदेंत पडला व शिंद्यानें पुणें शहर
…ाना फडणविसाची केदेंतून सुटका. [लुटलें.
…ना फडनविसाचा मृत्यु. [झाला.
…ज व दुसरा बाजीराव यांजमध्यें वसई येथें तह
…रा बाजीराव पुन्हा गादीवर बसला. [बसला.
१८०८ शाहू महाराज मृत्यु पावला, व प्रतापसिंह गादीवर
१८१५ त्रिंबकजी डेंगळ्यानें गंगाधरशास्त्री ह्यास मारिलें.
१८१७ खडकी, कोरेगांव आणि अष्टें या ठिकाणीं लढाया.
१८१८ इंग्रजांनीं पेशव्यांचें राज्य घेतलें. [गादीवर बसविलें.
१८३९ इंग्रजांनीं प्रतापसिंहास पदच्युत केलें, व शाहाजीस
१८४८ शाहाजी मृत्यु पावला, व सातारचें राज्य इंग्रजांनीं
खालसा केलें.

## पेशव्यांची वंशावळ.

बाळाजी विश्वनाथ.
- बाजीराव.
  - बाळाजी ऊर्फ नानासाहेब.
    - विश्वासराव.
    - माधवराव.
    - नारायणराव.
      - सवाई माधवराव.
  - रघुनाथराव.
    - बाजीराव (दुसरा).
    - चिमाजी.
    - अमृतराव (दत्तक).
  - जनार्दनपंत.
- चिमणाजी आपा.
  - सदाशिवराव.

# मराठ्यांची वंशावळ.

- बाबाजी.
  - मालोजी.
    - शाहाजी.
      - शिवाजी.
        - संभाजी.
          - शाहू.
            - रामराजा (दत्तक).
              - शाहूमहाराज (दत्तक).
                - प्रतापसिंह.
                - शहाजी.
        - राजाराम.
          - शिवाजी.
            - रामराजा (हा शाहूला दत्तक दिला होता.)
      - संभाजी.
      - व्यंकोजी.
    - सरीफजी.
  - विठोजी.

शहाजीचा निर्वंश होऊन गादीला कोणी वारस नसल्यामुळें इंग्रज सरकारानें इ० स० १८४८ त राज्य खालसा केलें.

**समाप्त.**

पोतदारांचें अधिक माहात्म्यसार-प्राकृत ओंवीबद्ध. अध्याय ३१. प्रत्येक अध्यायास चित्र. किं. १। रु.

---

# पोतदारांची नीतिपर व मनोरंजक पुस्तकमाला.

करुणराघव—( उत्तररामचरित्र ) ... ...किंमत १ रुपया.
ललितवत्सराज ( पूर्वार्ध )—( रत्नावली ) ...किंमत ८ आणे.
ललितवत्सराज ( उत्तरार्ध )—(प्रियदर्शिका )...किंमत ८ आणे.
चारुदत्त आणि वसंतसेना—(मृच्छकटिक).किंमत १ रुपया.
प्रणयिमाधव—( मालतीमाधव ) ... ...किंमत १ रुपया.
आर्यचाणक्य—( मुद्राराक्षस ) ... ...किंमत १ रुपया.
विदग्धपुरूरवा—( विक्रमोर्वशी ) ... ...किंमत १४ आणे.
राजा अग्निमित्र—( मालविकाग्निमित्र ) ...किंमत १ रुपया.
शिवदिग्विजय अथवा तरुण शिवाजी नाटक. किं० १ रु०.
सुंदरी आणि वसंतसेन—भाग १ ला ...किंमत ४ आणे.
„ भाग २ रा किंमत ६ आणे व भाग ३ रा किंमत १० आणे.
सद्गुणीसगुणा (स्त्रियांस वाचण्याजोगें) पृष्ठें ६०. किंमत ४ आणे.
गोदावरी अथवा दुर्दैवी सून. पृष्ठें १३०. किंमत १२ आणे.
भुवनसुंदरी (उत्तम नवीन कल्पित कादंबरी)...किंमत १ रुपया.
शहाणा गोविंदराव (एका सुखी कुटुंबाची हकीकत). किं. ३ आणे.
संगीत ययातिनाटक किर्लोसकरांचे चालींवर. किंमत ८ आणे.
मनोहर नाटक. पृष्ठें १८०. (दुःखपर्यवसायी ) किंमत १२ आणे.
सुंदराबाई ( एक चटकदार लहानशी गोष्ट ) किंमत १ आणा.
चातुर्यरत्नावलि-भाग १, २, ३, ४, प्रत्येकाची किंमत अर्धा आणा.
विनोदपर गोष्टी भाग १ ला, २ रा व ३ रा प्रत्येकीं किं. ४॥ आणे.

## ऐतिहासिक व शास्त्रीय पुस्तकें.

वैद्यविज्ञान—( वैद्यकीसंबंधीं नवीन पुस्तक. ) किंमत १ रुपया.
बापूगोखले यांचें चरित्र—२ री आवृत्ति. किंमत १२ आणे.
अन्न आणि पाणी (अत्यंत उपयोगी पुस्तक)...किंमत ८ आणे.
राष्ट्रभाषा ( सर्व हिंदुस्थानाची एक भाषा करणें यावर निबंध. )
केशव वामन पेठे यांनीं लिहिलेला... ... किंमत ३ आणे.
विद्येविषयीं चार शब्द ( नवीन निबंध )...किंमत १॥ आणा.

## पोतदारांची धर्मविषयक पुस्तकमाला.

ऋग्वेदी ब्रह्मकर्म सुटी पोथी ८ आणे, रेशमी बांधीव किं० १२ [illegible]
रुद्राची पोथी मोठ्या अक्षराची ... ... किंमत २
अद्भुत रामविजय—नवीन ओंवीबद्ध ग्रंथ अध्याय २८. किंमत २ रुपये
कल्किविजय—ओंवीबद्ध ग्रंथ अध्याय ३६ ... किंमत १॥ रुपये
सत्यनारायणपूजा सटिप्पणी सार्थकथा च. ... किंमत ४ आणे
वटसावित्रीपूजा सटिप्पणी सार्थकथा च. ... किंमत ६ आणे
हरितालिकापूजा सटिप्पणी सार्थकथा च. ... किंमत ४ आणे
सिद्धिविनायक (गणेश) पूजा सटिप्पणी सार्थकथा च. किंमत ५ आणे
ऋषिपंचमीपूजा सटिप्पणी सार्थकथा च. ... किंमत ५ आणे
अनंतचतुर्दशीपूजा सटिप्पणी सार्थकथा च. ... किंमत ६ आणे
सत्यविनायकपूजा सटिप्पणी सार्थकथा च. ... किंमत ७ आणे
कृष्णलीलामृत-प्राकृत ओंवीबद्ध श्रीधरकृत. ... किंमत ४ आणे
एकादशीमाहात्म्य ओंवीबद्ध अध्याय ३ ... ... किंमत ३ आणे
बालहितोपदेशिका सुधारलेली २ री आवृत्ति ... किंमत ३॥ आणे

## पोतदारांची पुराणोक्तकथासार पुस्तकमाला.

(सरळ गोष्टीच्या रूपानें)

| पुस्तकांचीं नांवें. | आ० | पे. | पुस्तकांचीं नांवें. | आ० | पे. |
|---|---|---|---|---|---|
| श्रीदत्तजन्मचरित्र ... | १ | ० | बकासुरवधचरित्र ... | १ | ० |
| सावित्रीचें चरित्र ... | १ | ० | महानंदाचरित्र ... | १ | ० |
| शनिमाहात्म्यकथासार. | १ | ६ | चंडिकाचरित्र ... | १ | ० |
| पांडुरंगमाहात्म्यकथासार | २ | ० | शबरचरित्र ... ... | १ | ६ |
| प्रल्हादचरित्र... ... | १ | ० | नागोबा साधूचें चरित्र. | १ | ० |
| मंगलागौरीकथासार... | १ | ० | चांगदेवचरित्र ... | ४ | ६ |
| भस्मासुराचें चरित्र... | १ | ६ | मिराबाईचरित्र ... | १ | [illegible] |
| गोरोबाकुंभाराचें चरित्र | १ | ० | सीमंतिनीचरित्र ... | ४ | [illegible] |
| अहल्याचरित्र ... | ३ | ० | पुराणांतील गोष्टी भाग १ला, २रा व ३रा प्रत्येकी किं. ४ | | ० |
| सुलोचनाचरित्र ... | ४ | ० | | | |